## थोडक्यात

### यंत्रात ओढणी अडकली; महिलेचा मृत्यू

**चांदवड ।** पिकावर कीटकनाशक फवारणी करताना फवारणी यंत्रात ओढणी अडकल्याने गळफास बसून एका शेतकरी महिलेचा मृत्यू झाला. तालुक्यातील वाकी खुर्द गावी ही घटना झाली. कावेरी सोपान सोनवणे (४०) असे मयत महिलेचे नाव आहे. या घटनेने गावात शोककळा पसरली आहे. चांदवड पोलीस ठाण्यात याची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.

### तरुण जखमी

**मालेगाव ।** चालत्या बसमधून पडल्याने एक तरुण जखमी झाला. व्यंकटेश मोहिते (रा. संगमेश्वर) हा एम.एच.१४-एलएक्स-५९३१ या धुळे-मुंबई बसने नाशिक येथे जात असताना जुन्या महामार्गावर चालू गाडीतून पडल्याने जखमी झाला. त्याला उपचारासाठी सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### तरुणाचा मृत्यू

**देवळा ।** तालुक्यातील चिंचवे येथील एका तरुणाचा झोपेतच मृत्यू झाला. देवळा पोलीस ठाण्यात याची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. शेखर सुरेश पवार (३२) असे मयत तरुणाचे नाव आहे. तो रात्री शेतातून आल्यानंतर झोपला होता. या घटनेची माहिती रवींद्र पवार याने पोलीस ठाण्यात दिली. पो.उ.नि. कैलास गुजर तपास करत आहेत.

### शेळ्या लांबवल्या

**मालेगाव ।** शहरातील जमहूर कॉलनी भागातून १० हजार रुपये किमतीच्या तीन शेळ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार आझादनगर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. महेमुदा असिफ शेख या महिलेने या संदर्भात पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिच्या मालकीच्या या तीन शेळ्या चोरीला गेल्याचे तिने फिर्यादीत नमूद केले आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

### दुचाकीस्वार ठार

**चांदवड ।** लासलगाव-चांदवड रस्त्याने वेगात जाणाऱ्या मालट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत एक दुचाकीस्वार ठार झाला. आर.जे. १७-जीए-९२९७ या मालट्रकने एम.एच.-१५-डीएफ-२२२६ या दुचाकीला पाठीमागून धडक दिली. यात दिगंबर राजू पाथरे (२१, रा. चांदवड) हा गंभीर जखमी होऊन मयत झाला. चांदवड पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

### विषबाधेने शेतकऱ्याचा अंत

**मनमाड ।** शेतातील पिकावर कीटकनाशक फवारणी करताना तोंडात विषारी औषध गेल्याने मोहेगाव येथील शेतकऱ्याचा मृत्यू झाला. विक्रम रामराव भुसनळ (५०) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. त्याला विषबाधा झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र तो उपचारादरम्यान मयत झाला. मनमाड पोलीस ठाण्यात याची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.

### महिलेची आत्महत्या

**चांदवड ।** तालुक्यातील काळखोडे येथील महिलेने विषारी औषध सेवन करून आत्महत्या केली. सुनीता ज्ञानेश्वर शेळके (४५) असे मयत महिलेचे नाव आहे. तिने आपल्या घरीच विष प्राशन केले. तिला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच ती मयत झाली. पोलिसांनी याची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद केली आहे.

### पाच जणांवर गुन्हा

**मालेगाव ।** बनावट संमतीपत्र तयार करून मालमत्ता हडप केल्याच्या आरोपावरून पाच जणांविरुद्ध छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नीलेश पंडित कुलकर्णी (४९, रा. बोरीवली) यांनी याबाबत पोलिसांत फिर्याद दिली आहे. संशयित नितीन मोहिनीराज महाजन, चारुदत्त महाजन, सुलभा जोशी, गजानन कुलकर्णी, अशोक कुलकर्णी यांनी बनावट कागदपत्र तयार केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

### पावसाने दिलासा

**मालेगाव ।** शहर परिसरात गत दोन दिवसांपासून होत असलेल्या पावसामुळे तीव्र तापमानाने त्रस्त शहरवासियांना दिलासा मिळाला आहे.

# मनमाडला मुसळधार पाऊस

## खरीप पिकांना जीवदान; शहरात जनजीवन विस्कळीत

**मनमाड । प्रतिनिधी**



शहर परिसरासह ग्रामीण भागात आज सलग दुसऱ्या दिवशी पावसाचे जोरदार आगमन झाले. मुसळधार पावसाने शहराला अक्षरश: झोडपून काढल्याने सर्वच रस्ते जलमय होऊन सखल भागात पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले.

दरम्यान, दमदार पावसामुळे करपू लागलेल्या खरीप पिकांना जीवदान मिळणार आहे. दुबार पेरणीचे संकट टळल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला, मात्र नदी-नाले ओसंडून वाहतील असा मोठा पाऊस झालेला नसल्याने विहिरींना अद्याप पाणी उतरलेले नाही.

यंदा मे महिन्यात जोरदार अवकाळी पाऊस झाला होता. त्यानंतर जून महिन्यातदेखील पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पुढेही चांगला पाऊस होईल या आशेवर शेतकऱ्यांनी खरिपाची पेरणी केलेली पिकेदेखील चांगली बहरली असताना पावसाने पाठ फिरवली होती. तब्बल २० दिवसांपेक्षा जास्त पावसाने उसंत घेतल्यामुळे याचा परिणाम पिकांवर होऊन पिके करपू लागली होती. पिकांनी मान टाकल्याचे पाहून दुबार पेरणी तर करावी लागणार नाही ना? अशी चिंता शेतकऱ्यांना भेडसावत होती. तर तीव्र तापमानाने नागरिक हैराण झाले होते. दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झालेली असताना शुक्रवारी दमदार पावसाचे आगमन झाले. रात्रभर पावसाची संततधार सुरू होती. शनिवारी सकाळी पावसाने उघडीप घेतली मात्र दुपारनंतर पुन्हा पावसाला सुरुवात होऊन एक तासापेक्षा जास्त वेळ जोरदार पाऊस झाला. सलग दोन दिवस दमदार पाऊस झाल्यामुळे उकाड्याने हैराण नागरिकांना दिलासा मिळाला तसेच करपू लागलेल्या पिकांना जीवदान मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा जीव भांड्यात पडला.

### पावसाची हजेरी

**त्र्यंबकेश्वर ।** श्रीकृष्ण जन्मोत्सव येथे मध्यरात्री साजरा करण्यात आला. मात्र यावेळी पावसाने हजेरी लावल्याने भाविकांच्या उत्साहात भर पडली.

त्र्यंबकेश्वरमध्ये झालेल्या पावसाने हवेत गारठा निर्माण झाला. तसेच जोरदार पावसामुळे बाहेरगावाहून आलेल्या पर्यटक, भाविकांची धावपळ उडाली. पावसाचा जोर वाढवल्याने जवळपास चार तास पडत होता.

# शेतकरी कुटुंबाचा आत्मदहनाचा प्रयत्न

**येवला । प्रतिनिधी**

येथील तहसील कार्यालय आवारात ध्वजारोहणाचा कार्यक्रम सुरू असतानाच पारेगाव येथील शेतकरी कुटुंबाने शेतातील शिवरस्ता खुला करावा या मागणीसाठी अंगावर डिझेल टाकत आत्मदहाचा प्रयत्न केला.

शिवरस्ता फक्त कागदोपत्री खुला करण्यात आल्याचा आरोप करत संजय पाठे, विजय पाठे आणि सुलभा पाठे (रा. पारेगाव) या शेतकरी कुटुंबासह जवाहरलाल भोसले यांनी शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने शेती करावी, कशी असा प्रश्न उपस्थित केला. अनेक वेळा प्रयत्न करूनदेखील मार्ग निघत नसल्याने शेवटी आत्मदहन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे यावेळी शेतकरी कुटुंबाने सांगितले.

दरम्यान, शहर पोलीस निरीक्षक अनिल भवारी आणि तालुका पोलीस निरीक्षक संदीप मंडलिक यांनी तातडीने हस्तक्षेप करत आत्मदहन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला.

सदर शिवरस्ता खुला करण्यात आल्याचे येवला तहसीलदार आबा महाजन यांनी सांगितले तर सदर घटनेनंतर तहसीलदार महाजन यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत त्वरित शिवरस्ता खुला करण्याच्या सूचना दिल्या. ध्वजारोहणप्रसंगी तहसील कार्यालय आवारात शेतकरी कुटुंबाने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने हा चर्चेचा विषय ठरला आहे.

**आंदोलनकर्त्यांवर गुन्हा**

दरम्यान, कुठलीही तक्रार न देता स्वतःला पेटून घेण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी मंडळ अधिकारी नारायण गायके यांच्या फिर्यादीनुसार शहर पोलीस ठाण्यात शेतकरी आंदोलनकर्त्यांवर गुन्हा दाखल झाला आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक अनिल भवारी यांनी दिली.

> नागरिकांना आपल्या कामाप्रश्नी न्याय मिळत नसेल तर वरिष्ठांकडे अर्ज देऊन दाद मागितली पाहिजे, असे टोकाचे पाऊल उचलणे नियमबाह्य आहे. नागरिकांना कुठलेही आंदोलन करायचे असेल तर अगोदर निवेदन देणे बंधनकारक आहे, विनापरवाना कुठल्याही प्रकारचे आंदोलन केल्यास गुन्हा दाखल केला जाईल.
>
> **– अनिल भवारी, पोलीस निरीक्षक येवला**

# कळवणला ठेकेदारांचे ठिय्या आंदोलन

**कळवण । प्रतिनिधी**




कळवण तालुक्यात ठेकेदारांनी शासनाकडून मागील दोन ते तीन वर्षापासून थकीत असलेली बिले न मिळाल्यामुळे संतप्त ठेकेदारांनी स्वातंत्र्य दिनी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.शासनाने दखल घेतली नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

१५ ऑगस्ट रोजी सकाळपासूनच कळवण सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर ठेकेदार मोठ्या संख्येने जमा झाले. थकीत बिले तातडीने द्या, या मागणीसहङ्ग सरकार व प्रशासना विरोधात घोषणा देण्यात आले. या आंदोलनात संघटनेचे पदाधिकारी रमेश शिरसाठ, धीरेन पगार, हेमंत पाटील, आबा सूर्यवंशी, संदीप भुसे यांच्यासह अनेक ठेकेदारांनी शासन व सार्वजनिक बांधकाम अधिकाऱ्यांच्या निष्क्रिय भूमिकेविरोधात तीव्र आक्रोश व्यक्त केला.

आंदोलनादरम्यान परिसरात तणाव वाढू लागल्याने पोलीस प्रशासनाने हस्तक्षेप करून मध्यस्थी केली. त्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले. मात्र, ठेकेदारांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शासनाने ठोस भूमिका घेतली नाही तर आत्मदहनकरण्याचा निर्णय कायम आहे.ङ्गआंदोलनानंतर ठेकेदारांच्या वतीने कार्यकारी अभियंता उमेश पाटील यांना निवेदन देण्यात आले. या वेळी फिल्डर ऑस्ट्रेलियन संस्थेचे पदाधिकारीही उपस्थित होते. अभियंता पाटील यांनी ठेकेदारांना तातडीने थकीत देयकांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. यावेळी कळवण, मालेगाव बिल्डर्स असोसिएशनसह देवळा व सटाणा तालुक्यातील ठेकेदारांनीही या आंदोलनात सहभाग नोंदवला. मालेगाव बिल्डर्स असोसिएशन यांच्या वतीने कळवण, देवळा व सटाणा तालुक्यातील ठेकेदार भूषण पगार, अजय पगार, विजय गुंजाळ, नरेंद्र वालखडे, प्रतीक गुंजाळ, निलेश वाघ, किशोर चव्हाण, वैभव पाटील उपस्थित होते.

# गॅस सिलिंडरचा स्फोट; घरातील साहित्य जळाले

**चांदवड । प्रतिनिधी**

येथील पोलीसपाटील बाबूराव सोनवणे यांच्या राहत्या घरी आज दुपारी दोन वाजेच्या सुमारास घरगुती गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन आग लागली. या आगीत घरातील संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्याने मोठी वित्तहानी झाली, मात्र सुदैवाने जीवितहानी झाली नाही. स्फोटानंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर धुराचे लोट पसरले होते. मंगरूळ टोलनाक्यावरील अग्निशमन पथकाने घटनास्थळी धाव घेत



आगीवर नियंत्रण मिळवले. स्फोटाचा मोठा आवाज झाल्याने परिसरात दहशत पसरली.

# अपघातात महिला ठार

**वणी । वार्ताहर**

सापूतारा रस्त्यावर अंबानेर फाट्याजवळ दुचाकीला पाठीमागून येणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याने महिला जागीच ठार तर एक गंभीर जखमी झाला आहे.

पिंपरखेड ता. दिंडोरी येथील आश्रमशाळे इयत्ता पहिलीत असलेल्या मुलाना भेटण्यासाठी वडपाडा ता. सुरगाणा येथील मनोज लक्ष्मण देशमुख, (२९ ) व माधुरी मनोज देशमुख (२५) हे मोटरसायकलवर आले होते. ते शाळेत मुलाला भेटुन वणी येथे कृषी औषधे घेण्यासाठी येत असतांना अंबानेर फाट्याजवळ त्यांच्या दुचाकीस पाठीमागुन आलेल्या दुचाकीने धडक दिली. यात पुढील मोटरसायकलवरील पाठीमागे बसलेली माधुरी देशमुख ह्या मोटरसायकलवरुन उडून डोक्यावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला. तर दुचाकीचालक मनोज देशमुख मोटरसायकलसह पुढे आठ ते दहा फुट घसरत गेले. यात त्यांना किरकोळ दुखापत झाली. पाठीमागून धडक देणारे मोटरसायकल चालक नारायण काशिनाथ रक्ते (४०) रा. नाशिक हे पांडाणे आश्रमशाळेत शिपाई असून ते गंभीर जखमी झाले आहेत.

# बस चारीत उलटली; प्रवासी जखमी

**पिंगळवाडे । वार्ताहर**

सटाणा आगाराची एस.टी. बस टिघरी येथे जात असताना उतराणे-श्रीपुरवडे रस्त्यावर आज दुपारच्या सुमारास उलटली. बसचा वेग कमी असल्याने सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र विद्यार्थ्यांसह प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. अरूंद रस्ता त्यातच साईडपट्टीचे काम झाले नसल्याने समोरून येत असलेल्या वाहनास साईड देण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाल्याचे प्रवाशांनी सांगितले.

सटाणा आगाराची बस (क्र. एम.एच.-०७ सी-९४३०) दुपारच्या सुमारास टिघरीकडे जात असताना उतराणे ते श्रीपुरवडे रस्त्यावर उलटली. बस रस्त्याच्या कडेला चारीत उलटल्याचे पाहताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत बसमधील प्रवाशांना बाहेर काढले.

या रस्त्याचे काम नव्यानेच झाले आहे. मात्र कामाचा दर्जा निकृष्ट पातळीचा आहे. त्यातच संबंधित ठेकेदाराने या रस्त्याच्या साईटपट्टीचे काम केलेले नाही. अरूंद रस्ता व कच्च्या प्रकारातील साईडपट्टी असल्यामुळे ही बस चारीत उलटली.

चालकाने समोरून वाहन येत असल्याने वेग खूपच कमी केला होता. बस उलटत असल्याचे लक्षात आल्याने सावध झाल्याने मोठा अप्रिय प्रकार टळल्याचे प्रवाशांनी सांगितले. रस्त्याच्या चुकीच्या कामामुळे अपघात नित्याचे झाले आहेत. संबंधित विभागाने या रस्त्याच्या गुणवत्तेकडे लक्ष द्यावे व अपूर्ण अवस्थेत



असलेले साईडपट्टीचे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी श्रीपुरवडे सरपंच जितेंद्र सूर्यवंशी यांनी केली आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

**सिन्नर । प्रतिनिधी**

शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना शुक्रवारी (दि.१५) सकाळच्या सुमारास तालुक्यातील कारवाडी येथे घडली.

विकास रेवबा जाधव हे त्यांच्या शेत गट नं. ८३ मधील शेतात सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात असताना शेतात दडून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे जाधव यांची गाळण उडाली. बिबट्याने त्यांच्या अंगावर झेप घेतल्याने त्यांच्या हाताला व पायाला बिबट्याची नखे खोलवर रुतली गेली. त्यानंतर त्यांनी प्रसंगावधान राखत आरडा-ओरड करण्यास सुरुवात केली. त्यांनी बिबट्याला प्रतिकार केल्याने बिबट्याने त्यांना सोडून पळ काढला. जाधव यांनी गावात येत ग्रामस्थांना याबाबत खबर दिली. वनविभागाला माहिती मिळताच सेवकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. जाधव यांना देवपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी त्यांना नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. परिसरात बिबट्याच्या मुक्त संचारामुळे शेतकऱ्यांमध्ये भिती पसरली आहे. त्यातच जाधव यांच्यावर हल्ला झाल्याने शेतकरी घराबाहेर पडण्यासही धजावत नाहीत. वनविभागाने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**कारवाडीतील घटना**

